# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, उपविभागीय अधिकारी चाळीसगांव भाग चाळीसगांव यांचे अधिनस्त रिक्त असलेल्या पोलीस पाटील पद भरती 2023 चा ऑनलाईन जाहिरनामा तपासला असून तो बरोबर असून अंतिम करण्यात येत आहे व त्यात नमूद केलेल्या सर्व बाबी, आरक्षण तसेच अटी व शर्ती अचूक असल्याची खात्री करण्यात आली आहे, करीता हे प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

उपविभागीय दंडाधिकारी,
चाळीसगांव भाग चाळीसगांव

# जाहिरनामा

**उपविभागीय दंडाधिकारी चाळीसगांव भाग चाळीसगांव यांचे कार्यालय, जिल्हा जळगांव**
**पोलिस पाटील पदभरती साठी जाहिरात 2023**
**जाहिरात क्र. 2/2023**

जळगाव जिल्हयातील **चाळीसगाव** उपविभागातील उपविभागीय दंडाधिकारी, चाळीसगाव कार्यालयांतर्गत गाव पोलिस पाटील पदभरतीसाठी अर्हता धारक उमेदवाराकडून विहित नमुन्यात फक्त ऑनलाईन पध्दतीनेच https://jalgaon.ppbharti.in या संकेतस्थळावर अधिकृत अर्ज मागविण्यात येत आहेत.

चाळीसगाव उपविभागातील पोलिस पाटील संवर्गातील एकूण रिक्त पदे— 41

| ऑनलाईन अर्ज भरण्याची सुरवात | ऑनलाईन अर्ज भरण्याची अंतिम मुदत |
|---|---|
| दिनांक 18/07/2023 वेळ 00-00 वा. पासून | दिनांक 31/07/2023 सायं — 23-59 वा. पर्यंत |

पोलिस पाटील भरती प्रक्रिया संदर्भात सविस्तर जाहीरात https://jalgaon.ppbharti.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून उमेदवारांनी संपुर्ण माहीती काळजी पूर्वक समजून घेऊनच ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करावेत. प्रस्तुत पदांकरीता केवळ उक्त संकेतस्थळावरुन विहित ऑनलाईन पध्दतीने भरलेले अर्ज विहित चलनाव्दारे भरलेले प्रक्रिया शुल्क ग्राहय धरण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्विकारण्यात येणार नाहीत. सदर संकेत स्थळाला भरती प्रक्रिये दरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेची माहिती बाबत अद्यावत राहण्याची जबाबदारी उमेदवारांची राहिल.

भरती प्रक्रिया/परीक्षा स्थगीत करणे किंवा रद्द करणे, अंशत: बदल करणे, पदांच्या एकूण गावनिहाय संख्येमध्ये वाढ किंवा घट आरक्षणात बदल करण्याचे अधिकार तसेच भरती प्रक्रिये संदर्भात प्राप्त तक्रारीबाबत अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार उपविभागीय दंडाधिकारी, चाळीसगाव भाग चाळीसगाव यांना राहतील व त्यांचा निर्णय अंतिम असेल.

दिनांक /07/2023
ठिकाण :- चाळीसगाव

उपविभागीय दंडाधिकारी,
चाळीसगाव भाग चाळीसगाव

# चाळीसगांव उपविभागातील रिक्त असलेली पोलीस पाटील पदे भरणेबाबत जाहिरनामा
## जाहिरात क्रमांक 2/2023

जळगाव जिल्हयातील चाळीसगांव उपविभागाचे उपविभागीय दंडाधिकारी यांच्या कार्यक्षेत्रातील ( तालुका - गाव) या गावात पोलीस पोलीस पाटील पदभरतीसाठी अर्हताधारक अमेदवारांकडून विहीत नमुन्यात ऑनलाईन पध्दतीने अधिकृत अर्ज मागविण्यात येत आहे.

| ऑनलाईन अर्ज भरण्याची सुरवात | ऑनलाईन अर्ज भरण्याची अंतिम मुदत |
|---|---|
| दिनांक 18/07/2023 वेळ 00-00 वा. पासून | दिनांक 31/07/2023 सांय 23-59 वा पर्यंत |

परिक्षा शुल्क खाली प्रमाणे विहीत पध्दतीने भरावे लागेल.

| | | |
|---|---|---|
| खुला प्रवर्ग - | रुपये 600/- | Online payment पद्धतीने |
| आरक्षीत/आर्थीक घटक प्रवर्गासाठी - | रुपये 500/- | |

(वर दर्शविण्यात आलेले प्रक्रिया शुल्क बँक प्रोसेसिंग चार्जेस वगळून आहे.)

SBI Collect द्वारे नेटबँकिंग / डेबिट कार्ड / क्रेडीट कार्ड द्वारे ऑनलाईन पद्धतीने प्रक्रिया शुल्क भरल्यास निवडलेल्या पर्यायानुसार आवश्यक ते बँकेचे सेवा शुल्क भरावे लागेल.

ऑनलाईन पद्धतीने शुल्क भरणा-या उमेदवारांनी त्यांचा व्यवहार यशस्वी (Payment Transaction Successfull झाल्याची संपूर्ण खात्री करुन घ्यावी, प्रक्रिया शुल्क भरण्याकरीता नेटबँकिंग / डेबिट कार्ड / क्रेडीट कार्ड वापरून होणा-या व्यवहारांची जबाबदारी संपुर्णत: उमेदवाराची आहे व उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय, चाळीसगांव भाग यास जबाबदार असणार नाही.

सरळ सेवा भरती प्रक्रीयेची सविस्तर जाहिरात https://jalgaon.ppbharti.in या संकेतस्थळावर उपलब्ध होईल. अर्जदाराने संपूर्ण प्रक्रीया काळजीपूर्वक समजून ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करावेत. पोलीस पाटील पदाचे परिक्षेचे अर्ज फक्त ऑनलाईन पध्दतीनेच स्विकारले जातील. प्रस्तुत पदाकरीता केवळ उक्त स्थळावरच ऑनलाईन पध्दतीने भरलेले अर्ज व विहीत परिक्षा शुल्क असलेले अर्ज ग्राहय धरण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे परिक्षा शुल्क स्विकारण्यात येणार नाही. सदर संकेतस्थळावर भरती प्रक्रिया दरम्यान वेळोवेळी भेट देवून भरती प्रक्रीयाच्या माहितीबाबत अद्यावत व जागृत राहण्याची जबाबदारी अर्जदाराची राहील.

भरती प्रक्रिया परिक्षा स्थगित करणे किंवा रद्द करणे, अंशत : बदल करणे, पदाच्या एकूण व आरक्षण प्रवर्गनिहाय संख्येमध्ये वाढ किंवा घट करण्याचे अधिकार तसेच भरती प्रक्रिचे संदर्भात वाद तक्रारी बाबत अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार उपविभागीय दंडाधिकारी चाळीसगांव यांनी राखून ठेवले असून त्यांचा निर्णय अंतिम असेल याची सर्वांनी नोंद घ्यावी. चाळीसगांव उपविभागातील पोलीस पाटलांची मंजूर पदे भरणे आवश्यक आहे. त्याबाबतची माहिती खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | पोलीस स्टेशनचे नाव | तालुका | गावाचे नाव | आरक्षणाची प्रवर्ग | महिला आरक्षण |
|---|---|---|---|---|---|
| 1 | चाळीसगांव ग्रामीण | चाळीसगांव | ओढरे | अनु. जाती | समांतर महिला |
| 2 | मेहुणबारे | चाळीसगांव | चिंचगव्हाण | अनु. जाती | समांतर महिला |
| 3 | चाळीसगांव ग्रामीण | चाळीसगांव | डोणदिगर | अनु. जाती | |
| 4 | मेहुणबारे | चाळीसगांव | शिरसगांव | अनु. जाती | |
| 5 | मेहुणबारे | चाळीसगांव | भऊर | अनु. जाती | |
| 6 | चाळीसगांव ग्रामीण | चाळीसगांव | एकलहरे | अनु. जाती | |
| 7 | चाळीसगांव ग्रामीण | चाळीसगांव | खराडी | अनु. जाती | |
| 8 | चाळीसगांव ग्रामीण | चाळीसगांव | ढोमणे | अनु. जाती | समांतर महिला |
| 9 | चाळीसगांव ग्रामीण | चाळीसगांव | गुजरदरी | अनु. जमाती | |
| 10 | चाळीसगांव ग्रामीण | चाळीसगांव | शामवाडी | अनु. जमाती | समांतर महिला |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 11 | मेहुणबारे | चाळीसगांव | रामनगर | अनु. जमाती | |
| 12 | चाळीसगांव ग्रामीण | चाळीसगांव | बेलदारवाडी | भ.ज.( ब ) | |
| 13 | मेहुणबारे | चाळीसगांव | पळासरे | भ.ज.( ब ) | समांतर महिला |
| 14 | चाळीसगांव ग्रामीण | चाळीसगांव | कृष्णनगर | भ. ज. (क ) | |
| 15 | चाळीसगांव ग्रामीण | चाळीसगांव | चतुर्भूजतांडा | भ. ज. (क ) | समांतर महिला |
| 16 | चाळीसगांव ग्रामीण | चाळीसगांव | रोहिणी | भज(ड) | समांतर महिला |
| 17 | चाळीसगांव ग्रामीण | चाळीसगांव | भामरे बु. | इ.मा. व. | समांतर महिला |
| 18 | चाळीसगांव ग्रामीण | चाळीसगांव | वाकडी | इ.मा. व. | |
| 19 | चाळीसगांव ग्रामीण | चाळीसगांव | मुंदखेडे खु. | इ.मा. व. | समांतर महिला |
| 20 | मेहुणबारे | चाळीसगांव | अभोणे | इ.मा. व. | |
| 21 | चाळीसगांव ग्रामीण | चाळीसगांव | शेवरी | इ.मा. व. | |
| 22 | मेहुणबारे | चाळीसगांव | आडगांव | इ.मा. व. | |
| 23 | चाळीसगांव ग्रामीण | चाळीसगांव | रोकडे | इ.मा. व. | |
| 24 | मेहुणबारे | चाळीसगांव | विसापुर | आर्थिक दृष्टया दुर्बल घटक | समांतर महिला |
| 25 | चाळीसगांव ग्रामीण | चाळीसगांव | चंडिकावाडी | आर्थिक दृष्टया दुर्बल घटक | |
| 26 | चाळीसगांव ग्रामीण | चाळीसगांव | इच्छापुर तांडा क्र. 1 | आर्थिक दृष्टया दुर्बल घटक | |
| 27 | चाळीसगांव ग्रामीण | चाळीसगांव | वलठाण तांडा नं. 32 | आर्थिक दृष्टया दुर्बल घटक | समांतर महिला |
| 28 | चाळीसगांव ग्रामीण | चाळीसगांव | हरीनगर | खुला | |
| 29 | चाळीसगांव ग्रामीण | चाळीसगांव | पिंपळगांव | खुला | |
| 30 | चाळीसगांव ग्रामीण | चाळीसगांव | विष्णुनगर | खुला | समांतर महिला |
| 31 | चाळीसगांव ग्रामीण | चाळीसगांव | इच्छापुर तांडा क्र. 2 | खुला | समांतर महिला |
| 32 | चाळीसगांव ग्रामीण | चाळीसगांव | इच्छापुर तांडा क्र. 3 | खुला | समांतर महिला |
| 33 | मेहुणबारे | चाळीसगांव | कृष्णापुरी | खुला | |
| 34 | चाळीसगांव ग्रामीण | चाळीसगांव | कोंगानगर | खुला | |
| 35 | चाळीसगांव ग्रामीण | चाळीसगांव | चैतन्य तांडा क्र. 4 | खुला | |
| 36 | मेहुणबारे | चाळीसगांव | दिपनगर | खुला | |
| 37 | मेहुणबारे | चाळीसगांव | परशरामनगर | खुला | |
| 38 | चाळीसगांव ग्रामीण | चाळीसगांव | साईनगर | खुला | समांतर महिला |
| 39 | मेहुणबारे | चाळीसगांव | सुंदरनगर | खुला | |
| 40 | मेहुणबारे | चाळीसगांव | सेवानगर | खुला | |
| 41 | चाळीसगांव ग्रामीण | चाळीसगांव | सोनगांव | खुला | |

**पोलीस पाटील पदासाठी किमान आवश्यक अर्हता**

1) अर्जदार हा दहावी (एस.एस.सी.) उत्तीर्ण असावा.
2) (अ) वयोमर्यादे करीता अर्जदाराचे दिनांक 18 जुलै 2023 रोजीचे वय विचारात घेतले जाईल.
   (ब) अर्जदाराचे वय दिनांक 18 जुलै 2023 रोजी 25 पेक्षा कमी नसावे व 45 पेक्षा जास्त नसावे.
   (क) पोलीस पाटील पदाकरीता वयोमर्यादा शिथीलक्षम नाही.
3) अर्जदार हा स्थानिक व कायम रहिवाशी असावा. (अर्जदाराने राशन कार्ड, निवडणूक कार्ड, ओळखपत्र, आधारकार्ड, स्वयंघोषणापत्र किंवा ज्या पुराव्याने स्थानिक व कायम रहिवासी असल्याचे सिध्द होते, अशा

**कोणत्याही एक पुराव्याची प्रत अर्जसोबत जोडणे आवश्यक राहील, व मुलाखातीचे वेळी मुळ पुरावा सादर करणे आवश्यक राहील.)**

4) **अर्जदाराने अर्जामध्ये स्वत:चा ई-मेल व नंबर नमूद करणे अनिवार्य आहे.**
5) **अर्जदार शारीरिकदृष्टया सक्षम असावा व अर्जदाराचे चरित्र निष्कलंक असणे आवश्यक आहे.**
6) **महाराष्ट्र राज्य सेवा (लहान कुटूंबातील प्रतिज्ञापत्र) नियम 2005 मधील लहान कुटूंबाची अर्हता धारण करणे आवश्यक (अर्जदार याची अर्हता दिनांकास दोन पेक्षा जास्त अपत्य नसावेत.)**
7) **मागास प्रवर्गासाठी आरक्षित पदाकरीता त्या प्रवर्गाचे सक्षम अधिकारी यांनी निर्गमित केलेले जातीचे प्रमाणपत्र आवश्यक राहिल.**
8) **इतर मागास प्रवर्ग, विशेष मागास प्रवर्ग, विजा-अ व भज ब, क, ड या प्रवर्गातील अर्जदार यांना भरती कालावधी करीता वैध असलेले उन्नत आणि प्रगत गटात (क्रिमीलेअर) या मध्ये मोडत नसल्याबाबतचे (नॉन क्रिमीलेअर) प्रमाणपत्र जोडणे आवश्यक राहील.**
9) **इतर मागास प्रवर्ग, विशेष मागास प्रवर्ग, विजा अ व भज- ब, क, ड या प्रवर्गातील महिला पदांसाठी अर्ज करणाऱ्या अर्जदार यांना भरती कालावधी करीता वैध असलेले उत्पन्न आणि प्रगत व्यक्ती व गट (क्रिमीलेअर) यामध्ये मोडत नसल्याबाबतचे (नॉन क्रिमीलेअर) प्रमाणपत्र आवश्यक राहील.**

**<u>परिक्षेचे स्वरुप</u>**

| अ.क्र. | पदनाम संवर्ग | परिक्षेचे गुण | | |
|---|---|---|---|---|
| | | लेखी परिक्षा | तोंडी परिक्षा गुण | एकूण गुण |
| 1 | पोलीस पाटील | 80 | 20 | 100 |

**<u>लेखी परिक्षेच्या प्रश्नपत्रिकेचे स्वरुप साधारणपणे खालील प्रमाणे राहील:-</u>**

1) पोलीस पाटील पदाची लेखी परिक्षा 80 गुणांची असेल प्रत्येक प्रश्न एक गुणाचा राहील.
2) लेखी परिक्षेची प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ व बहुपर्यायी स्वरुपाची असेल.
3) लेखी परिक्षा इयत्ता दहावी (एस. एस. सी.) पर्यंतच्या अभ्यासक्रमावर आधारित असेल यात सामान्य ज्ञान, गणित, पोलीस पाटलांचे अधिकार व कर्तव्य. बुध्दीमत्ता चाचणी, स्थानिक परिसराची माहिती चालू घडामोडी इत्यादी विषयाचा समावेश असेल.
4) लेखी परिक्षेत एकूण 80 गुणांपैकी किमाण 36 गुण (45%) प्राप्त केलेल्या अर्जदारामधील उच्चतम गुण मिळालेल्या पर्याप्त प्रमाणातील अर्जदाराची तोंडी परिक्षा घेण्यात येईल.
5) सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र. प्रनिम/2010/2009/प्र. क्र.66/10/13-अ दिनांक 16/06/2010 मधील तरतुदीनुसार लेखी परिक्षा घेतेवेळी उत्तर पत्रिकेवर उत्तर लिहोण्यासाठी अथवा चिन्हांकित करण्यासाठी फक्त काळया शाईचा बॉलपेन वापर करावा लागेल.
6) लेखी परिक्षेत मुलाखतीस पात्र ठरलेल्या उमेदवारास पोलीस पाटील भरती / निवडीसाठी घेण्यात येणाऱ्या 20 गुणांच्या तोडी (मुलाखत) परिक्षेस उपस्थित राहणे अनिवार्य राहील तोड़ी परिक्षेत अनुपस्थित राहणारा उमेदवार अंतिम निवडीस अपात्र ठरेल. मात्र एखादया उमेदवाराला मुलाखतीत शुन्य गुण मिळाले असले तरी लेखी परिक्षेतील गुणांच्या आधारे तो जर गुणवत्ता यादीत येत असेल तर असा उमेदवार पोलीस पाटील पदावरील निवडीकरिता पात्र राहील.

**<u>निवड कार्यपध्दती, अटी व शर्ती :-</u>**

1) प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे गुणवत्तेनुसार अंतिम निवडीसाठी अर्जदारांस पात्रता व इतर संबंधीत मुळ प्रमाणपत्र तपासणीसाठी उपलब्ध करुन दयावी अन्यथा तोंडी परिक्षा अंतिम निवडीसाठी त्याचा विचार केला जाणार नाही.
2) लेखी परिक्षा, तोंडी परीक्षा, कागदपत्रे छाननी, इ. करिता प्रवेशपत्र, कार्यक्रम, विविध सूचना या केवळ संकेत स्थळावरुनच उपलब्ध करण्यात येतील. पोस्टाद्वारे पाठविण्यात येणार नाहीत. सबब सदर संकेतस्थळाला भरती प्रक्रिये दरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेची माहिती / कार्यक्रमा बाबत अद्ययावत राहण्याची प्रवेशपत्र डाऊनलोड करून घेण्याची जबाबदारी उमेदवाराची राहिल.
3) लेखी परिक्षेअंती मुलाखतीसाठी पात्र अर्जदारांचे जाहीरातीनुसार आवश्यक पात्रता व अर्जात भरलेली माहिती यांच्या आधारे मुळ कागदपत्रे पडताळणी करण्याकरीता अंतरीम स्वरुपात यादी जाहीर करण्यात येईल. ज्या अर्जदाराची जाहीरातीनुसार आवश्यक पात्रता व अर्जात भरलेली माहिती परिक्षा शुल्क कागदपत्रांच्या आधारे परिपूर्ण सिध्द होईल अशाच अर्जदाराचा विचार भरती प्रक्रियेच्या पुढील टप्याकरीता करण्यात येईल. जाहिरातीत नमुद केलेली संपूर्ण अर्हता अर्जात भरलेली माहिती

व मूळ कागदपत्रे तपासणीच्या वेळी सादर केलेली कागदपत्रे यामध्ये तफावत आढळल्यास अर्जदाराची उमेदवारी भरतीच्या कुठल्याही टप्प्यावर रद्द होवू शकेल. तसेच अशा अर्जदाराचे परिक्षा शुल्क इत्यादी सारख्या सवलती नामंजुर करण्यात येतील. याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

4) अर्जदार शारिरीकदृष्टया सक्षम असल्याबाबतचे अधिक्षक, ग्रामिण रुग्णालय यांचे अथवा वरिष्ठ वैद्यकिय अधिका-यांचे प्रमाणपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील व अर्जदाराची पात्रता वैद्यकिय तपासणी अंतीच निश्चित करण्यात येईल.

5) अर्जदाराचे चारित्र्य निष्कलंक असल्याबाबतचे संबंधीत पोलीस स्टेशनचे चारीत्र्य प्रमाणपत्र, कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.

6) अर्जदारांचे कोणत्याही राजकीय पक्षाशी संबंध नसावा. त्याचप्रमाणे इतर ठिकाणी संपूर्ण वेळ नोकरी करणारा नसावा. त्याचप्रमाणे ग्रामपंचायत सदस्य नसावा. तसेच खाजगी किंवा निमसरकारी संस्थेचा सदस्य नसावा, अथवा पूर्णवेळ नोकरी करणारा नसावा याबाबतचे रुपये 100/- च्या स्टॅम्प पेपरवरील प्रतिज्ञापत्र, कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.

7) पोलीस पाटील पदांवरील नियुक्तीकरीता मृत / सेवानिवृत्त पोलीस पाटलांच्या वारसांनी अर्ज केल्यास त्याला प्राधान्य देण्यात येईल. परंतु याचा अर्थ एकाच स्थानासाठी Position) पोलीस पाटलांच्या वारसांसह दोन किंवा अधिक अर्जदारांना समान गुण मिळाल्यास पोलीस पाटलांच्या वारसांची निवड करण्यात प्राधान्य देण्यात येईल. परंतु तो महाराष्ट्र ग्रामपोलीस पाटील (सेवा प्रवेश, पगार भत्ते आणि सेवेच्या इतर शर्ती) आदेश 1968 व त्यामध्ये वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारणानुसार त्या गावांसाठी ठरविण्यात आलेल्या सामाजिक/समांतर आरक्षणाचा असला पाहिजे.

8) अर्जदार संबंधीत गावाचा स्थानिक व कायमचा रहिवासी असणे आवश्यक आहे.

9) अर्जदार कोणत्याही एकाच गावाचा स्थानिक / कायमचा रहिवासी असू शकतो. सबबअर्जदाराने अशाच एका गावात अर्ज करावा. एकापेक्षा अधिक गावातून केलेले सर्व अर्ज बाद करण्यात येतील.

10) प्रत्येक गावात केवळ एक पद उपलब्ध आहे व ते शासकिय निकषानुसार आरक्षितकरण्यात आलेले आहे. अर्ज करतांना अर्जदाराने आरक्षण तपासून अर्ज करावा. (आरक्षणव्यतिरीक्त असलेल्या उमेदवारांनी अर्ज करु नये.)

11) सपूर्ण जळगाव जिल्हयात **चाळीसगाव** उपविभागातील रिक्त पदांच्या सर्व गावांसाठी एकाच दिवशी व वेळी परिक्षा घेण्यात येईल.

12) संपूर्ण भरती प्रक्रीया गाव निहाय होणार असून कोणत्याही दोन गावाच्या प्रक्रियेचा एकमेकांशी संबंध नसेल.

13) पोलीस पाटील हे पद वर्गीकृत नाही.

14) पोलीस पाटलांना क्षेत्रिय स्तरावर (Field work) काम करावे लागते. त्यामुळे सदर पदधारण करणारी व्यक्ती ही शारीरिक दृष्टया सक्षम असणे आवश्यक आहे. त्यामुळे त्यांना अपंगासाठीचे आरक्षण लागु करण्यात आलेले नाही.

15) पोलीस पाटील हे पद एका गावात एकच असते त्यामुळे हे पद एकाकी असल्याने त्यांना प्रकल्पग्रस्त, माजी सैनिक, खेळाडू यासारखी समांतर आरक्षणे लागू होत नाहीत.

16) महाराष्ट्र राज्य लोकसेवा अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती यांचेसाठी आरक्षण अधिनियम 2001 (सन 2004 चा महाराष्ट्र अधिनियम क्र. 08) हा अधिनियम महाराष्ट्र दिनांक 29/01/2004 पासून अंमलात आणला आहे. त्यानुसार उन्नत व प्रगत गटाचे (क्रिमीलेअर) तत्वतः अनुसूचित जाती, खुला प्रवर्ग यांना लागू आहे. सदर प्रवर्गातील अर्जदारांकडे भरतीकरीता वैध असलेले नॉन क्रिमीलेअरचे तत्वतः अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, खुला प्रवर्ग यांना लागू राहतील. तसेच त्याबाबत सक्षम प्राधिकारी यांनी निर्गमित केलेले प्रमाणपत्र, कागदपत्र पडताळणीचे वेळी सादर करणे आवश्यक राहील.

17) महिलांसाठी आरक्षित पदांकरिता दावा करणाऱ्या उमेदवारांनी महिला आरक्षणाचा लाभ घ्यावयाचा असल्यास त्यांनी अर्जामध्ये न चुकता महाराष्ट्राचे अधिवासी (Domiciled) असल्याबाबत प्रमाणपत्र सादर करावे. तसेच महाराष्ट्र शासन, महिला व बालविकास विभाग, शासन निर्णक क्र. महिआ २०२३/प्र.क्र.२२३/कार्या- २ दि.४ मे २०२३ अन्वये खुल्या गटातील महिलांकरिता आरक्षीत असलेल्या पदावर निवडीकरिता नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्राची अट रद्द करणेत आलेली आहे. तसेच, अनुसूचित जाती व अनुसुचित जमाती वगळता अन्य मागास प्रवर्गातील महिलांकरिता आरक्षित असलेल्या पदावरील निवडीसाठी दावा करु इच्छिणाऱ्या महिलांना त्या त्या मागास प्रवर्गासाठी इतर मागासवर्ग व बहुजन कल्याण विभाग तसेच सामान्य प्रशासनाकडून वेळोवेळी विहित करण्यात आल्याप्रमाणे नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

18) सामान्य प्रशासन विभागाकडील शासन अधिसूचना क्र. एसआरव्ही-2000/प्र.क्र.17/2000/12, दिनांक 28/03/2005 व क्र.एसआरव्ही-2000/प्र.क्र.17/2000 दिनांक 01/07/2005 तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम 2005 अन्वये दिनांक 28/03/2005 रोजी हयात असलेले व त्यानंतर जन्माला आलेल्या अपत्यांच्या संख्येबाबत लहान कुटुंब असल्याचे विहीत नमुन्यातील प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक आहे. तसेच अविवाहीत असणाऱ्या उमेदवारांनेही विहीत (अ) नमुन्यातील प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक आहे.

19) लेखी परिक्षेत पात्र ठरलेल्या अर्जदारास पोलीस पाटील भरती निवडीसाठी घेण्यात येणा-या 20 गुणांच्या तोंडी (मुलाखत) परिक्षेस अनुपस्थित राहणारा अर्जदार अंतीम निवडीस अपात्र ठरेल. उमेदवाराला मुलाखतीत शुन्य गुण मिळाले असले तरी

लेखी परिक्षेतील गुणांच्या आधारे तो जर गुणवत्ता यादीत येत असेल तर असा अर्जदार पोलीस पाटील पदांवरील निवडीकरीता पात्र राहील.

20) समान गुण मिळाल्यास अंतिम निवड शासन निर्णय क्र. डीव्हीपी-1113/1767/प्र.क्र.592/ पोल-8, दिनांक 22/08/2014 अन्वये गुणवत्ता यादीतील एकाच स्थानासाठी (Position) दोन किंवा अधिक अर्जदाराला समान गुण मिळाल्यास प्राधान्य क्रमाच्या आधारे उमेदवारांची अंतीम निवड केली जाईल.

1) पोलीस पाटलांचे वारस, त्यानंतर

2) अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास उच्च शैक्षणिक अर्हता धारणकरणारे अर्जदार, त्यानंतर

3) माजी सैनिक असलेले अर्जदार, त्यानंतर

4) वयाने जेष्ठ असलेले अर्जदार पोलीस पाटलांच्या वारसामध्ये पती, पत्नी आणि दोन मुले यांचा समावेश त्याव्यतिरीक्त अन्य कोणत्याही नातेवाईकांचा वारस म्हणून विचार करता येणार नाही.

21) याशिवाय महाराष्ट्र ग्राम पोलीस अधिनियम 1967 व त्यास संलग्न असलेले नियम आणि वेळोवेळी शासनाने निर्गमित केलेले आदेश शासन निर्णय, परिपत्रकातील नेमणुकीसाठी इतर प्रचलित असलेल्या अटी सुध्दा बंधनकारक असतील.

22) हा जाहीरनामा / जाहिरात प्रसिध्द होण्यापुर्वी ज्या उमेदवारांनी पोलीस पाटील पदांसाठी कोणत्याही प्रकारचे अर्ज केले असतील ते सर्व अर्ज रद्द झाले आहेत, असे समजण्यातयेईल.

## ऑनलाईन अर्ज करण्याची पद्धत :-

1) प्रस्तुत पदांकरीता फक्त https://jalgaon.ppbharti.in या अधिकृत संकेतस्थळावरून विहित पध्दतीने भरलेले ऑनलाईन पध्दतीने केलेले अर्ज स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात नोंदविलेला ई-मेल आयडी व मोबाईल क्रमांक चुकीचा / अपुर्ण तसेच मोबाईल क्रमांक NCPR रजिस्टर्ड (DND) असल्यामुळे संपूर्ण भरती प्रक्रिये दरम्यान त्या द्वारे पाठविल्या जाणा-या सूचना, संदेश व माहीती उमेदवारांना प्राप्त न झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील. तसेच ई-मेल आयडी व मोबाईल संदेश वहनात येणा-या तांत्रिक अडचणींना उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय, **चाळीसगाव भाग चाळीसगाव** हे जबाबदार असणार नाही. सदर संकेत स्थळाला भरती प्रक्रिये दरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेची माहितीबाबत अद्ययावत राहण्याची जबाबदारी उमेदवाराची राहिल.

2) पात्र उमेदवाराला वेब बेस्ड (Web-based) ऑनलाईन अर्ज https://jalgaon.ppbharti.in या वेबसाईटद्वारे दिनांक 18 /07/2023 ते दि. 31/07/2023 या कालावधीत सादर करणे आवश्यक राहील.

3) उमेदवारांचे अर्ज ऑनलाईन (online) पध्दतीने स्वीकारण्यात येणार असल्याने अर्ज करतांना, शैक्षणिक कागदपत्रे, अन्य प्रमाणपत्रे जोडणे आवश्यक आहे. तथापि, ऑनलाईन अर्जामध्ये उमेदवाराने त्यांची पात्रतेनुसार काळजीपूर्वक संपूर्ण व खरी माहिती भरणे आवश्यक आहे. ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरताना काही चुका झाल्यास किंवा त्रुटी राहील्यास व भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्ज नाकारला गेल्यास त्यांची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत उमेदवाराची राहील व याबाबत उमेदवारास तक्रार करता येणार नाही. ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती बदलता येणार नाही, जाहिरातीत नमूद केलेल्या सर्व अटी शैक्षणिक अर्हता व मागणीनुसार आरक्षण वगैरेची पात्रता तपासून ऑनलाईन अर्ज भरावा.

4) उमेदवाराची लेखापरीक्षा ही त्यांनी ऑनलाईन अर्जात नमूद केलेल्या गृहित पात्रतेनुसार कोणतीही कागदपत्रे पूर्व तपासणी / छाननी न करता घेतली जाणार असल्यामुळे या परीक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे उमेदवाराला निवडीबाबत कोणतेही हक्क राहणार नाहीत. कागदपत्राच्या पूर्ण छाननीनंतर उमेदवारांची पात्रता निश्चित करण्यात येईल. लेखी परिक्षेच्या प्राथमिक चाळणी/तोंडी परीक्षेनुसार गुणवत्तेच्या आधारे उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात नमूद केलेल्या गृहित पात्रतेनुसार अंतरिम यादी प्रसिध्द करून उमेदवारांच्या कागदपत्रांची सखोल छाननी केली जाईल. सदर प्रक्रियेत उमेदवार अपात्र आढळल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल. पात्रता धारण न करणा-या उमेदवारांना भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अपात्र करण्याचे संपूर्ण अधिकार उपविभागीय दंडाधिकारी **चाळीसगाव भाग चाळीसगाव** यांचे जवळ राखून ठेवण्यात आलेले आहेत व याबाबत उमेदवारास कोणतीही तक्रार करता येणार नाही.

5) ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना https://jalgaon.ppbharti.inया संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. ऑनलाईन पध्दतीने शुल्क भरणा-या उमेदवारांनी त्यांचा व्यवहार यशस्वी (Payment Transaction Successful) झाल्याची खात्री करुन घ्यावी प्रकीया शुल्क भरण्याकरीता नेट बँकींग/ डेबीट कार्ड/ क्रेडीट कार्ड वापरुन होणा-या व्यवहाराची संपुर्णत: जबाबदारी उमेदवाराची आहे व उप विभागीय **दंडाधिकारी कार्यालय, चाळीसगाव** यास जबाबदार असणार नाही.

6) ऑनलाईन पध्दतीने अर्ज करताना स्वत:चा अद्यावत (Latest)विहीत नमुन्यातील पासपोर्ट साईझ फोटो व सही स्कॅन करुन https://jalgaon.ppbharti.in मधील सुचनेनुसार विहीत पध्दतीने अपलोड करणे अनिवार्य आहे.

7) ऑनलाईन अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम तारीख व वेळेनंतर संकेत स्थळावरील ऑनलाईन अर्ज भरण्याची लिंक बंद केली जाईल.

8) ऑनलाईन अर्ज प्रकियेच्या सर्व टप्यातील माहिती परिपूर्ण भरुन विहीत परिक्षा शुल्क भरलेल्या उमेदवारांची स्थिती परिक्षेची रुपरेषा /वेळापत्रक /परिक्षा केंद्र/ बैठक क्रमांक इत्यादीबाबत ची माहिती वर दिलेल्या (वेबसाईट) वर वेळोवेळी उपलब्ध करुन देण्यात येईल. यासंबधी स्वतंत्र पत्रव्यवहार केला जाणार नाही. सदर संकेत स्थळाला भरती प्रक्रिये दरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेची माहितीबाबत अद्यावत राहण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.

9) ज्या उमेदवारांनी यापूर्वी जरी त्यांचे नाव रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्राकडे सेवायोजन कार्यालय/समाजकल्याण आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी कार्यालयात नांवे नोंदविलेली आहेत अशा उमेदवारांना विहित मुदतीत स्वतंत्ररित्या ऑनलाईन अर्ज करणे व परीक्षाशुल्क भरणे आवश्यक राहिल. अशा उमेदवारांनी अन्य कोणत्याही मार्गाने सादर केलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत अशा उमेदवाराना या कार्यालयामार्फत स्वतंत्रपणे कळविले जाणार नाही.

10) माजी सैनिक उमेदवारांनी जिल्हा सैनिक बोर्डात नावनोंदणी केलेली असणेआवश्यक आहे. सदरप्रमाणपत्र, कागदपत्र पडताळणीच्यावेळी सादर करावे लागेल.

11) महाराष्ट्र राज्य लोकसेवा अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती निरधिसूचीत जमाती (विमुक्त जाती भटक्या जमाती, विशेष मागासवर्ग व इतर मागासवर्ग यांच्यासाठी आरक्षण अधिनियम 2001 (सन 2004 था महाराष्ट्र अधिनियम क्र. 8) अधिनियम महाराष्ट्र शासनाने दिनांक 29 जानेवारी 2004 पासून अंमलात आणला आहे. त्यानुसार उन्नत व प्रगत गटाचे (क्रिमीलेअर) तत्ववि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड). विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागासवर्ग यांना लागू आहे. या प्रवर्गातील उमेदवारांनी जात, उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे वैध असलेले (अद्ययावत नॉनक्रिमीलेअर) प्रमाणपत्र कागदपत्र तपासणीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

12) महिलांसाठी आरक्षित पदांकरिता दावा करणाऱ्या उमेदवारांनी महिला आरक्षणाचा लाभ घ्यावयाचा असल्यास त्यांनी अर्जामध्ये न चुकता महाराष्ट्राचे अधिवासी (Domiciled) असल्याबाबत प्रमाणपत्र सादर करावे. तसेच महाराष्ट्र शासन, महिला व बालविकास विभाग, शासन निर्णक क्र. महिआ २०२३/प्र.क्र.२२३/कार्या- २ दि.४ मे २०२३ अन्वये खुल्या गटातील महिलांकरिता आरक्षित असलेल्या पदावरतो निवडीकरिता नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्राची अट रद्द करणेत आलेली आहे. तसेच, अनुसूचित जाती व अनुसुचित जमाती वगळता अन्य मागास प्रवर्गातील महिलांकरिता आरक्षित असलेल्या पदावरील निवडीसाठी दावा करु इच्छिणाऱ्या महिलांना त्या त्या मागास प्रवर्गासाठी इतर मागासवर्ग व बहुजन कल्याण विभाग तसेच सामान्य प्रशासनाकडून वेळोवेळी विहित करण्यात आल्याप्रमाणे नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

13) सामान्य प्रशासन विभाग अधिसूचना क्र.एसआरव्ही- 2000/प्र.क्र.17/2000/12 28 मार्च 2005 व शासनपरिपत्रक एसआरव्ही- 2000/प्र.क्र.17/2000/12, 01 जुलै 2005 नुसार विहित केलेल्यानुसार व महाराष्ट्र नागरी सेवा (लहानकुटूंबाचे प्रतिज्ञापन) नियम 2005 अन्वये शासनाने गट अ ब क ड मधील सेवाप्रवेशसाठी प्रतिज्ञा नमुना (अ) आवश्यक अर्हता म्हणून विहीत नमुन्यातील लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापत्र बंधनकारकआहे. सदरचे प्रतिज्ञापत्र कागदपत्र तपासणीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

14) ऑनलाईन अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे लेखी परिक्षेस/कागदपत्र पडताळणीस बोलविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला आहे असे नाही. निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्जदार विहित अर्हताधारण न करणारा आढळल्यास खोटी माहिती पुरविल्यास एखादया अर्जदाराने त्याचा निवडीसाठी निवड समितीवर प्रत्यक्ष अप्रत्यक्ष दबाव आणला अथवा गैरप्रकाराचा अवलंब केल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल. तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता त्यांची नियुक्ती समाप्तकरण्यात येईल व त्याच्या विरुध्दकायदेशीर कारवाई करण्यात येईल.

15) निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने अर्जात दिलेली माहिती अगर कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवारांची उमेदवारी नियुक्ती रद्द करण्यात येईल व शासनाची दिशाभूल केल्यामुळे त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

16) अपात्र अर्जदारास स्वतंत्र्यरित्या कळविले नाही.

17) परीक्षेस पडताळणीस मुलाखतीस बोलाविलेल्या अर्जदारांना स्वत: उपस्थित राहावे.

18) अर्जदाराने भरतीप्रकीये दरम्यान राजकीय दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास अश्या उमेदवारांची निवड रद्द करण्यात येईल.

19) वरील अटी, शर्ती नियमांव्यतिरीक्त शासनाने वेळोवेळी निर्गमीत केलेले आदेश व निर्णय लागू राहील.

दिनांक /07/02023
ठिकाण : **चाळीसगाव**

**उपविभागीय दंडाधिकारी, चाळीसगाव**
**तथा,**
**अध्यक्ष पोलीस पाटील पदभरती**
**प्रक्रिया समिती – 2023**